भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१०/२०१७

**१) कोंबडयाची चोरी. :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे १३.४० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे मालकीच्या पोल्ट्री फार्म मधुन ३०० नग कॉकरेल कोंबडया किंमती ३०,०००/–रु. च्या चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. मंगला केवलदास वाडीभस्मे वय ४४ वर्ष, रा. राजगुरु वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकलला धडक देवुन गंभिर जखमी करुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मुरलीधर पांडुरंग सार्वे वय ४५ वर्ष, रा. गुंथारा याचा भाऊ मृतक अंबादास पांडुरंग सार्वे वय ५० वर्ष, रा. गुंथारा हा एनएच ६ रोड क्रॉस करीत असतांना त्याचे सायकला यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकच्या सायकला धडक मारुन गंभिर जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**३) लाकडी बॅटने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/१०/२०१७ चे १९.०० ते २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा गोपाल उपासराव गजाम हा आपले घरी हजर असतांना यातील आरोपीने येवुन फिर्यादीचे मुलाला म्हटले की तु माझ्याशी पुर्वी पुण्या मध्ये भांडण केले व हाताला चावा घेतला तुला मी जिवंत राहुन देणार नाही असे म्हणुन सोबत आनलेल्या कपडे धुण्याच्या लाकडी बॅटने फिर्यादीचे मुलगा गोपाल यास डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. जयवंती उपासराव गजाम वय ४५ वर्ष, रा. रोंघा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**४) बाटलीने कपाडावर मारुन जखमी केले व पुढे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे १८.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुभाष मुरलीधर खोब्रागडे वय ४८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड पेट्रोल पंप ठाणा हा आपले घराचे गेट समोर बसला असता मोहल्यातील कुत्र्याचे पिल्लु दिसल्याने त्यास एरे टुण्या असे म्हटले असता यातील आरोपीने फिर्यादीस व मुलगी कु. पल्लवी वय २१ वर्ष, हीला शिवीगाळ करुन विहीरी जवळील बाटलीने कपाडावर मारुन जखमी केले व पुढे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी. :–**

दिनांक ०६/०९/२०१७ चे २१.०० ते २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गुंजन दिपक पाटील वय २५ वर्ष, रा. नेहरु वार्ड विद्या नगर भंडारा याचा भाऊ जखमी प्रणय दिपक पाटील वय २९ वर्ष, हा आपले बाजुने पायी जात असतांना श्रीनगर कॉलोनी समोरील सर्विस रोडने यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन समोरुन धडक दिल्याने जखमी हा खाली पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**६) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखल पात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने त्यांना विचारपुस केली असता समाधान कारक उत्तर न दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. राठोड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**७) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखल पात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने त्यांना विचारपुस केली असता समाधान कारक उत्तर न दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद;–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०१.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी ऑलआऊट ऑपरेशन नाकाबंदी दरम्यान मिळुन आल्याने त्याचे वैद्यकीय परीक्षण केले असता नशेच्या अमलात असल्याचे अभिप्राय मिळाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मेश्राम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**९) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा आमरोडवर बेवारस स्थितीत ऊभे करुन वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्यान सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गेडाम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**१०) जिण्याच्या पायऱ्यावरुन पाय घसरुन पडुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे ०८.४५ वाजता दरम्यान यातील मृतक मोरश्वर प्रल्हाद ऊके वय ५० वर्ष, रा. टेकेपार पुर्णवसन हा दिनांक १२/१०/२०१७ ला घराच्या जिण्याच्या पायऱ्यावरुन पाय घसरुन पडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान पावल्याने मरण पावल्याने डॉक्टर मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. बहादुरे. पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**११) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :–**

दिनांक १३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, करडी, सिहोरा, आंधळगाव, साकोली, पवनी, लाखांदुर व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण १८ गुन्हे दाखल करून ४८ लिटर हातभट्टी किंमती ४८००/–रु व ७७ लिटर १६० मिली देशी/ विदेशी दारु + २ मोटार सायकल किंमती ४८६८८/–रु. तसेच जुगारातुन ७,४८७/रु कि. असा एकुण ६०,९७५/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १३५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.